आर.सी.सी क्र.६८/२०२४
**निशाणी क्र.२३.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१**

माझे शपथेवर कथन की,

**नाव** – सविता योगेश चांडक,

**वय** – २७ वर्षे, **धंदा** – नोकरी,

**रा.** – मुक्काम कारेगाव, ता. शिरुर, जि. पुणे.

**सरतपास**

**अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस. दराडे यांचेकडून –**

०१. मी आरोपीस ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे. घटना दोन ते अडीच वर्षांपूर्वी घडली. माझे मूळ गांव चापडगाव हे आहे. माझ्या पतीचे नाव योगेश सच्चीतानंद चांडक असे आहे. चापडगाव येथे आमचे प्लास्टीक कटलरीचे दुकान होते. घटनेच्या दिवशी मी पुणे येथून चापडगाव येथे आले होते व चापडगाव बसस्थानकावरुन घरी जात होते. दुकानाच्या उधारीच्या कारणावरुन आमचे व आरोपीचे किरकोळ वाद झाले होते. त्यानंतर मी आरोपी विरुध्द पोलीस ठाणे शेवगाव येथे फिर्याद दिली. मला आता माझी फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासणीची परवाणगी मागीतली, परवाणी देण्यात आली.)**

०२. हे म्हणणे खरे नाही की, मी बसस्थानक चापडगाव येथून घरी जात असतांना माझा पाठलाग केला व मला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या मोबाईलवर SMS पाठविला होाता व माझ्या पतीने त्याबाबत आरोपीला जाब विचारला असता आरोपीने माझ्या पतीला मारहाण केली. मला आता फिर्याद मधील अधोरेखांकित भाग–अ आणि ब मला वाचून दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, सदर फिर्याद मधील अधोरेखांकित भाग–अ आणि भाग–ब मी पोलीसांना सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्याप्रमाणे पोलीसांनी फिर्याद लिहुन घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमची व आरोपीची आपसात तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपीस वाचविण्यासाठी खोटी साक्ष दिली.

**उलटतपास**

**आरोपींचे विधिज्ञ श्री. ए. बी. शेख यांचेकडून**

०३. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला फिर्याद वाचून दाखविली नाही व मी त्यावर

केवळ सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमचे आपसात मिटले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपी विरुध्द आता काही तक्रार नाही.

उलटतपास पूर्ण.

श्रुतलेखोत्तर स्विकृत,

VAISHALI SANJAY MORE
Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.02.11 12:36:16 +0530

दिनांकः– ११/०२/२०२५

(वैशाली सं. मोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.